सुराज्य सोलापूर ८
मंगळवार,
दि.२४ जानेवारी २०२३

# जो जिता वहीं सत्यजीत

## तांबे : राजकारणातील खरा हिरा



| | |
|---|---|
| नाव | सत्यजीत सुधीर तांबे |
| जन्म | २७ सप्टेंबर १९८३ |
| पत्नी | डॉ. मैथिली तांबे |
| अपत्य | एक मुलगी व एक मुलगा |

हम को तो राहें थी चलाती,
वो खुद अपनी राह बनता
गिरता संभालता मस्ती में चलता था वो...
हम सहमें से रहते कूएं में,
वो नदिया में गोते लगता
उलटी धरा चीर के तैरता था वो...

या ओळी महाराष्ट्रातील एका युवा राजकारण्याला परफेक्ट लागू होतात. तो युवा राजकारणी म्हणजेच सत्यजित तांबे. नाशिक पदवीधर मतदार संघात पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्याने तांबे यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला. त्यामुळे महाराष्ट्रात पाच ठिकाणी निवडणुका होत असताना सर्वाधिक चर्चा केवळ येथीलच होत आहे. सुशिक्षित तरुण, संवेदनशील व्यक्ती आणि एक महत्त्वाकांक्षी राजकारणी अशी सत्यजित तांबे यांची ओळख आहे. त्यांची राजकीय कारकीर्द अतिशय गौरवशाली आहे. चार पिढ्यांचा वारसा आणि १०० वर्षांची राजकीय परंपरा पुढे नेण्याचे काम ते करत आहेत. वारसा हक्काने मिळालेली संधी कर्तृत्वाने सिद्ध करत तांबे हेच राजकारणातील खरा हिरा असल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यामुळेच 'जो जिता वहीं सत्यजीत' अशी चर्चा तर होणारच.



### कौटुंबिक पार्श्वभूमी

सत्यजीत तांबे यांचा जन्म संगमनेर येथे डॉ. सुधीर तांबे आणि श्रीमती दुर्गाताई तांबे (नगराध्यक्षा- संगमनेर नगरपरिषद) यांच्या पोटी झाला. त्यांचे आजोबा भाऊसाहेब थोरात हे थोर स्वातंत्र्यसैनिक आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या प्रणेत्यांपैकी एक होते. उत्तर महाराष्ट्रात आणि आसपासच्या परिसरातील समाजकारणात सक्रिय सहभाग असलेल्या एका उच्चशिक्षित कुटुंबातून ते येतात. महाराष्ट्र सरकारमधील कॅबिनेट मंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचे ते भाचे आहेत. सत्यजीत तांबे हे व्यवस्थापन व राज्यशास्त्रातील पदव्युत्तर पदवीधर आहेत. अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठातील जॉन एफ केनेडी स्कूलमध्येही त्यांनी शिक्षण घेतले आहे.

### नवा अध्यक्ष नवी दृष्टी

२०१८ मध्ये महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या अत्यंत चुरशीच्या निवडणुकीत अमित झनक आणि कुणाल राऊत यांना पराभूत करून ते महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. अध्यक्ष या नात्याने त्यांनी युवक काँग्रेसचे महाराष्ट्राच्या राजकारणात दाखल घेण्यायोग्य शक्तीत रूपांतर केले. त्यांच्या कार्यकाळात २०१९च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी राबविलेल्या 'सुपर ६०' या उपक्रमामुळे महाराष्ट्र काँग्रेसला गेल्या निवडणुकीत गमावलेल्या २८ जागा जिंकण्यास मदत झाली. त्यांनी विधानसभा निवडणुकीसाठी स्वतंत्र 'युवकांचा जाहीरनामा'ही काढला. त्यांच्या कार्यकाळात 'सुपर १०००', पूरग्रस्तांना मदत व साहाय्य आणि कोविड-१९ हेल्पलाइन यांसारखे अनेक यशस्वी उपक्रमही राबवले गेले.



### सामाजिक योगदान

- ते 'जयहिंद लोकचळवळ' ही संस्था चालवतात. या संस्थेचा उद्देश लोकांमध्ये त्यांचे हक्क आणि कर्तव्यांबाबत जागरुकता निर्माण करणे हा आहे. संस्था समाजातील दुर्बल घटकांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय, आर्थिक आणि इतर मदत देखील करते.
- अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या बेरोजगार युवकांसाठी एमआयटी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवा मंच'च्या माध्यमातून रोजगार मेळाव्याचे आयोजन.
- यशस्वी युवकांचा शोध घेऊन त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी जैन युवा मंचच्या माध्यमातून युवा कल्याण शिबीर.
- जानेवारी २००३ मध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी 'जैन महिला मंच' स्थापन करण्यात हातभार लावला.
- गेल्या अनेक वर्षांपासून ते जयहिंद युवा मंचच्या माध्यमातून सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करत आहेत.
- 'जय हिंद युवा ट्रीप' या उपक्रमाद्वारे दरवर्षी शहरांच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी ते तरुणांना सहलीवर घेऊन जातात.
- ते पर्यावरण जागृती रॅली देखील काढतात. या माध्यमातून ते लोकांना पर्यावरणाचे महत्त्व आणि हवामान बदल रोखण्याकरिता लोकांनी हातभार लावावा यासाठी लोकांना जागरूक करण्याचे काम करतात.
- संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात निरोगी पर्यावरणासाठी वृक्षारोपण मोहीमही ते राबवत आहेत.
- 'युवा शेतकरी संमेलना' द्वारे तरुण शेतकऱ्यांना ओळख मिळवून देण्याचे काम केले जाते आणि विविध पुरस्कारही दिले जातात.
- लोकसहभागातून 'लाफ्टर चॅलेंज शो', 'फिटनेस क्लब', 'स्वच्छता मोहिम', 'सरपंच संसद' आणि यांसारख्या इतर अनेक उपक्रमांचे आयोजन ते सातत्याने करत असतात.
- तरुणांना विविध खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता ते जय हिंद क्रीडा महोत्सव देखील आयोजित करतात.

**राजकीय कारकीर्द :** सत्यजीत तांबे यांनी २००० मध्ये काँग्रेस कार्यकर्ता म्हणून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. २००७ मध्ये वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी त्यांनी जिल्हा परिषद निवडणुकीत विजय मिळवला आणि जिल्हा परिषद निवडणुकीत विजय मिळविणारे सर्वात तरुण सदस्य बनले. ते २०१७ पर्यंत जिल्हा परीषद सदस्य होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी 'वॉटर एटीएम' आणि 'एक दिवस शिक्षणाचा' असे अनेक उपक्रम राबवले.

**मालमत्ता :** सत्यजीत तांबे यांनी स्वत:चं वार्षिक उत्पन्न ४९ लाख रुपये असल्याचे सांगितले आहे. याशिवाय सत्यजीत यांच्याकडे ३० लाखांचे ६० तोळे सोनं असल्याची माहिती त्यांनी शपथपत्रात दिली आहे. सत्यजीत यांची पत्नी मैथिली तांबे यांच्याकडे १५.८५ कोटी रुपयांची जंगम आणि स्थावर मालमत्ता असून त्यांच्याकडे ५२ लाखांची रोकड आहे. याशिवाय पत्नीकडे दीड कोटींचे ३०० तोळे सोने असल्याची माहिती सत्यजीत तांबेंनी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या शपथपत्रात सांगितली आहे.

**वाचन- लेखनाची आवड :** राजकारणाव्यतिरिक्त शहरी विकास, युवा सक्षमीकरण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण हे सत्यजित यांचे आवडते विषय आहेत. २०१६ च्या अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीत त्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले आहे. त्यांना वाचनाची आवड आहे आणि ते स्तंभलेखनही करतात. त्यांनी 'आंदोलन' नावाचे पुस्तकही लिहिले आहे, जो भारतातील चळवळी आणि चळवळींच्या संस्कृतीची आणि महत्त्वाची माहिती देणारा ऐतिहासिक दस्तऐवज आहे.

### भारतीय जनता पक्षाचा देखील डोळा

सत्यजित तांबे यांनी विदेशात उच्च शिक्षणही घेतल आहे. सर्व प्रश्नांची त्यांना चांगली जाण आहे. ते राजकारणात सक्रिय झाले, तर त्याचा फायदा महाराष्ट्रासह देशाला होईल. मात्र काँग्रेस अद्यापही त्यांना संधी देत नाही. त्यामुळे काँग्रेसने जर संधी दिली नाही तर, सत्यजित तांबे यांच्यावर भारतीय जनता पक्षाचा देखील डोळा आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डिसेंबरमधील कार्यक्रमात म्हटले होते.

### कोविड कंट्रोल रुमचे काम


महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने कोरोना संकटामध्ये एका कट्रोल रुमची स्थापना करण्यात आली होती. आणि त्याच्या माध्यमातून रोज हजारो रुग्णांना आणि नातेवाईकांना मदत करण्याचे काम युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आले. रक्तदान शिबिर असेल रुग्णालयात बेड उपलब्ध करणे असेल आयसीयू बेड किंवा व्हेंटिलेटरचे बेड असेल रेमडेसिवीरचा औषधाबाबत असेल अशी अनेक कामे महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या कोविड कंट्रोल रुमच्या वतीने करण्यात आली. विशेष म्हणजे महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या या कोविड कंट्रोल रुमचे काम ४ महिला सांभाळत होत्या.

### अमेरिकन अध्यक्षपदाच्या निवडणुकीत स्वयंसेवक

सत्यजीत तांबे यांचे लक्ष शहरी विकास, युवा सक्षमीकरण आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावर आहे. २०१६च्या अमेरिकन अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले आहे.

### Social Campaigning

**सत्यजीत तांबे यांनी सोशल मिडीयामध्ये प्रश्न तुमचा, उत्तर माझे, भारतासमोरील आव्हाने, मी सोशल मिडीया चॅम्पियन असे अनेक उपक्रम राबवले आहेत.**




### 'सिटीझनविल' अनुवादित पुस्तक

नुकतेच त्यांचे 'सिटीझनविल' हे एक पुस्तक प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक कॅलिफोर्नियाचे लेफ्टनंट गव्हर्नर गॅविन न्यूजम यांच्या पुस्तकाचा मराठी अनुवाद आहे. हे पुस्तक न्यूजमच्या सॅन फ्रान्सिस्कोचे महापौर असतानाच्या अनुभवांवर आधारित आहे. मुळात सुशासन आणि लोकसहभाग हा या पुस्तकाचा विषय आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रकाशनादरम्यान सत्यजित यांच्यावर आमचा डोळे असल्याचे सूचक विधान फडणवीसांनी केले होते.

### सर्वात तरुण जि.प.सदस्य

सत्यजित तांबे हे व्यवस्थापन आणि राज्यशास्त्रात पदव्युत्तर पदवीधर आहेत. अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाच्या जॉन एफ केनेडी स्कूलमध्येही त्यांनी शिक्षण घेतले. वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी त्यांनी जिल्हा परिषद निवडणूक जिंकली आणि जिल्हा परिषद निवडणूक जिंकणारे सर्वात तरुण सदस्य ठरले.

युवा

### 'युवा जाहीरनामा'

२०१७ पर्यंत ते जिल्हा परिषद सदस्य राहिले. २०१८ मध्ये, सत्यजित यांनी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक जिंकली. युवक काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी गेल्या विधानसभा निवडणुकीसाठी वेगळा 'युवा जाहीरनामा'ही जारी केला होता.